लोकसत्ता
# ठाणे वृत्तान्त
इंडियन एक्सप्रेस ग्रुप
गुरुवार, ३० सप्टेंबर २००४

लोकसत्ता
गुरुवार, ३० सप्टेंबर २००४
ठाणे वृत्तान्त ३

## ज्योतिषवर्गाचा कार्यक्रम

**डोंबिवली:** श्री कृष्णमूर्ती ज्योतिष विद्यालय व पायरावास्तू रिसर्च फाऊंडेशनतर्फे ठाणे आणि परेल येथील ज्योतिष अभ्यासवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, तसेच प्रमाणपत्र वितरण समारंभ नुकताच ज्येष्ठ कवि मंगेश पाडगावकर व वेदमूर्ती प्रदीप जोशी यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी ज्योतिष शास्त्रातील पहिले पारितोषिक व सुवर्णपदक वसंत भिकाजी मुळम व नीलिमा पंडित यांना मिळाले.